# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७५ | शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### मुंबई मनपा एक्झिट पोल, ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग?

**मुंबई, ता. १५ :** मुंबई महापालिकेसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर जनमतचा खळबळजनक एक्झिट पोल समोर आला आहे. या अंदाजानुसार, गेल्या २५ वर्षांपासून मुंबईवर एकहाती सत्ता गाजवणाऱ्या उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या युतीला १३८ जागांसह स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे, ठाकरे बंधू आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ ६२ जागांवर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे. काँग्रेस आणि वंचित आघाडीला २०, तर इतरांना ७ जागा मिळतील असा अंदाज आहे. टाईम्स नाऊच्या पोलनुसारही महायुतीला सर्वाधिक ४२-४५ टक्के मते मिळतील, असे म्हटले आहे. जेव्हीसी च्या अंदाजानुसार महायुतीला १३८ जागा मिळतील, तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीला केवळ ५९ जागांवर समाधान मानावे लागेल. ॲक्सिस एक्झिट पोलनेही महायुतीला १३१ ते १५१ जागा मिळतील असा कल दिलाय.

# उरुळी कांचन, कोरेगाव मूळ व थेऊर जिल्हा परिषद गटात मतदारांना प्रलोभने

## देवदर्शने, सहलींसह वस्तू वाटपांचा सपाटा; विकासात्मक मुद्दा संपल्यातच जमा

**हनुमंत चिकणे**

उरुळी कांचन, ता. १५ : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विकासाच्या मुद्द्यांवर लढल्या जाव्यात, असे अपेक्षित असतानाही थेऊर, उरुळी कांचन व कोरेगाव मूळ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक याला अपवाद ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप तसेच इतर पक्षांकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून नागरिकांच्या मूलभूत अडचणींवर चर्चा करण्याऐवजी देवदर्शन, सहली, वस्तू वाटप आणि विविध आकर्षणांवर भर दिला जात असून मतदारांचे लोकानुनय घडवून आणले जात असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.




निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार यांसारख्या महत्त्वाच्या रचनात्मक विषयांवर ठोस कार्यक्रम राबवण्याबाबतची भूमिका कोणत्याही पक्षाकडून अद्याप समोर आलेली नाही. उलटपक्षी, प्रतिस्पर्धी उमेदवारी कशी अडवायची, कोणाला कसे रोखायचे, राजकीय डावपेच कसे रचायचे यावरच चर्चा केंद्रित झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे निवडणूक काळात तसेच निवडणूक निकालानंतरही जनतेच्या विकासाचे मुद्दे बाजूला पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जिल्हा परिषदेला ग्रामीण विकासाचे प्रमुख केंद्र म्हटले जाते. जिल्हा परिषदेला मिनी मंत्रालयचे स्वरूप प्राप्त झाले असून, समाजकल्याण, कृषी, पशुसंवर्धन, शिक्षण, बांधकाम तसेच महिला व समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जातात. ग्रामीण भागातील मूलभूत सेवा व सुविधांसह सर्वांगीण विकासाची जबाबदारी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर असते. मात्र यंदा पार पडत असलेल्या निवडणुकांमध्ये निवडणुकीच्या प्रचारात इच्छुक उमेदवार ही निवडणूक विकासात्मक मुद्द्यांऐवजी भावनिक, धार्मिक आणि आर्थिक प्रलोभनांवरच लढवताना दिसून येत आहेत.

या तिन्ही गटात निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांकडून जनतेसमोर कुठलाही कृती कार्यक्रम, जाहीरनामा किंवा वचननामा सादर करण्यात आलेला नाही. निवडून आल्यानंतर उमेदवार कोणती कामे करतील यावर चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र त्यावर कोणतीही ठोस चर्चा होत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे जनता देवदर्शन सारख्या यात्रांवर मतदान करेल असे मतदारांना ग्राह्य धरले जात आहे. भावनिक, धार्मिक आणि आर्थिक प्रलोभनांमुळे विकासाचा मुद्दा झाकोळला गेला आहे. परिणामी मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांकडून देवदर्शन व सहलींचा मार्ग स्वीकारला जात असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, पैसे देणे, दारू व मेजवानी, दारूच्या बाटल्या वाटप, कोंबडी पार्टी, जेवणावळी, साड्या, ब्लँकेट,इथपासून ते मतदारांनादबाव व भीती दाखवणे इथपर्यंत साम दाम दंड भेद यांचा वापर होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.ही सर्व प्रलोभने आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून कायद्याने गुन्हा आहे. मतदारांनी अशा प्रकारांना बळी न पडता निर्भयपणे आणि स्वेच्छेने मतदान करणे हे लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

### लोकशाहीसाठी धोक्याची घंटा

निवडणूक काळात आरोग्य, पाणीपुरवठा, रोजगार, शेतकरी प्रश्न यांसारख्या ज्वलंत समस्यांवर उमेदवार बोलताना दिसत नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. निवडणुका जवळ आल्यावर केवळ देवदर्शन, भेटवस्तू किंवा इतर प्रलोभने दाखवून मतदारांना गुंतवले जात असल्याचा आरोप काही जागरूक नागरिकांकडून करण्यात येत आहे. अशा दिखाऊ उपक्रमांपेक्षा स्थानिक प्रश्नांवर उमेदवारांची भूमिका काय आहे, विकासाचा त्यांचा अजेंडा नेमका काय आहे? हे तपासणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. पैसा, भेटवस्तू आणि देवदर्शनाच्या जोरावर मते मिळवण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक ठरेल, असा सूर नागरिकांमध्ये उमटत आहे.


> निवडणूक ही धार्मिक, भावनिक किंवा आर्थिक प्रलोभनांची स्पर्धा नसून विकासाच्या विचारांची लढाई असली पाहिजे. आदर्श आचारसंहिता भंग करणाऱ्या उमेदवारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. मतदारांनी निर्भयपणे, कोणत्याही दबावाला बळी न पडता मतदान करणे हीच खरी लोकशाही आहे.
>
> – **ॲड. गणेश दत्तात्रय जाधव**, पुणे

# भिगवण–राशीन महामार्गावर ट्रॅक्टर–कारचा अपघात; एकाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १५ : भिगवणराशीन राज्य महामार्गावर मंगळवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर आणि स्विफ्ट कार यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाल्याने हा अपघात घडला. ही घटना डिकसळ (ता. इंदापूर) गावाच्या हद्दीत रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.

या अपघातात अतुल बाबूलाल गजरमल (वय -३८ रा. कात्रज, ता. करमाळा, जि. सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर विजय हनुमंत शिंदे (वय ३८) आणि दादासो सर्जेराव डुबे (वय-३५, दोघे रा. कात्रज, ता. करमाळा, जि. सोलापूर) हे



गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, स्विफ्ट कार भिगवणकडून राशीनच्या दिशेने जात होती, तर ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर बारामतीच्या दिशेने येत होता. महामार्गावरील वळणावर दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाली. धडकेमुळे कारचा पुढील भाग पूर्णतः क्षतिग्रस्त झाला.

अपघाताची माहिती मिळताच भिगवण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला हटवून काही वेळानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

ऊस हंगाम सुरू झाल्यापासून बारामतीराशीन राज्य महामार्गावर हा सातवा मृत्यू असल्याचे समोर आले आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. अनेक ट्रॅक्टरवर आवश्यक सुरक्षा साधने नसल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका वाढत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या मार्गावर ऊस हंगामात वाहतुकीची मोठी वर्दळ असते. त्यामुळे प्रशासनाने विशेष वाहतूक नियोजन, वेगमर्यादेची अंमलबजावणी आणि रात्रीच्या वेळेत कडक तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# उरुळी कांचन ग्रामपंचायतीसमोर पिशवीत आढळले काळ्या बाहुल्यांसह हळद–कुंकू

**उरुळी कांचन, ता. १५ :** उरुळी कांचन ग्रामपंचायत समोरील एका दुकानाच्या बाहेर गुरुवारी (ता. १५) सकाळी भानामती आणि करणी-जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला. ग्रामपंचायत सचिवालयाच्या समोरच एका कापडी पिशवीत गुंडाळून ठेवलेले संशयास्पद साहित्य नागरिकांच्या निदर्शनास आले. विविध रंग लावलेली लिंबू, दोरे, सुया, काळ्या बाहुल्या अश्या वस्तू आढळून आल्या आहेत.



उरुळी कांचन येथे एकाच वेळी असे साहित्य आढळल्याने नागरिकांमध्ये भीती आणि चर्चेला तोंड फुटले आहे. काहीजणांनी या प्रकाराला अंधश्रद्धा पसरवून मानसिक दडपण आणण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. उरुळी कांचन व परिसरात शहरात घटनांनी पुन्हा डोके वर काढल्याने नागरिकांमध्ये संतापासह भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये व दुकानदरामध्ये संभ्रम निर्माण होऊन घबराहट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन ग्रामपंचायत सचिवालयात रोहित जाधव व विशाल जाधव हे दोघे भाऊ कामाला आहेत. सचिवालयाच्या बाहेरच त्यांचे मासे विक्रीचे दुकान आहे. ते त्यांची आई चालवते. बुधवारी रात्री दुकान बंद करून सर्वजण घरी गेले होते. यावेळी रात्रीच्या वेळेस अज्ञात व्यक्तीने दुकानाच्या बाहेर जादूटोण्याचा प्रकार केला. सकाळी दुकानाच्या बाहेर एक बेवारस पिशवी आढळून आली. यामध्ये विविध रंग लावलेली लिंबू, दोरे, सुया, काळ्या बाहुल्या अश्या वस्तू आढळून आल्या. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.

दरम्यान, अंधश्रद्धा निर्मुलनासाठी प्रयत्न होत असताना या प्रकारामुळे समाजात आजही अंधश्रद्धा किती खोलवर रुजलेली आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अशा रूढींविरुद्ध समाजात जागरूकता निर्माण करणे आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. या घटनेची माहिती पोलिसांना दिली नसल्याची माहिती मिळाली आहे.

# वडगाव बुद्रुक येथे खून प्रकरणातील आरोपी पोलिसांना धक्का देऊन पसार

**पुणे, ता. १५ :** खूनप्रकरणातील एका आरोपीने पोलिसांना धक्का देऊन पसार झाल्याची धक्कादायक घटना वडगाव बुद्रुक परिसरात घडली. पोलिसांच्या ताब्यातून फरार झालेल्या आरोपीचा शोध सुरू असून, त्याच्याविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिकेत महेश वाघमारे (वय २६, रा. लक्ष्मी विहार अपार्टमेंट, रोकडोबा मंदिराजवळ, हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता) असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या ताब्यातून पसार झाल्याप्रकरणी वाघमारेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रायगड जिल्ह्यातील माणगाव पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई श्रीकांत किरवले (वय २९) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

भोसरी येथील तरुणाला महाबळेश्वरला फिरायला नेण्याच्या बहाण्याने मित्रांनीच ताम्हिणी घाटात खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. या घटनेत आदित्य गणेश भगत (वय २२, रा. साईरेसिडेन्सी, इंद्रायणीनगर, भोसरी; मूळ रा. चोबे पिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर) याचा खून झाला होता.

या प्रकरणी अनिकेत महेश वाघमारे आणि तुषार ऊर्फ सोन्या शरद पाटोळे (वय २४, रा. सुशील गंगा अपार्टमेंट, कर्वेनगर) यांना अटक करण्यात आली होती. दोघांविरुद्ध रायगड जिल्ह्यातील माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मित्राची चोरलेली मोटार विकण्याच्या प्रयत्नात आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

बाणेर परिसरातून अटक केल्यानंतर बाणेर पोलिसांनी वाघमारे व पाटोळे यांना माणगाव पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर माणगाव पोलिसांचे पथक वाघमारे याला तपासासाठी सिंहगड रस्त्यावरील हिंगणे खुर्द परिसरात बुधवारी (दि. १४) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घेऊन आले होते. यावेळी पोलिसांनी त्याच्या घराचा पंचनामा केला. पंचनाम्यादरम्यान वाघमारे पोलिसांच्या ताब्यातच होता.

मात्र, अचानक पोलीस शिपाई किरवले यांना जोरदार धक्का देत वाघमारेने पळ काढला. या घटनेनंतर माणगाव पोलिसांनी तातडीने सिंहगड रस्ता पोलिसांना माहिती दिली. सध्या पसार झालेल्या आरोपीचा शोध सुरू असून, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास कदम पुढील तपास करत आहेत.

# बोटावरील शाई पुसली जात असल्याचे आरोप फेटाळले; राज्य निवडणूक आयोगाचा खुलासा

**पुणे, ता. १५ :** महापालिका निवडणुकांसाठी राज्यभरात मतदान प्रक्रिया सुरू असतानाच काही ठिकाणी मतदारांच्या बोटावरील शाई पुसली जात असल्याचे आरोप करण्यात आले. या आरोपांचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तातडीने पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणावर सविस्तर खुलासा केला.



राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की, मतदारांच्या बोटावर लावली जाणारी शाई पूर्णपणे अमिट असून, ही शाई भारतीय निवडणूक आयोग देशभरात ज्या शाईचा वापर करतो, तीच शाई राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी वापरण्यात येत आहे. शाई वेगळी किंवा निकृष्ट नसल्याचे आयोगाने ठामपणे सांगितले.

आयोगाने पुढे स्पष्ट केले की, एखादा मतदार दुबार मतदानासाठी आला आणि त्याला मतदानाची परवानगी देण्यात आली, तर संबंधित मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षावर थेट आणि कडक कारवाई करण्यात येईल. शाई पुसली जात असल्याचे आरोप निव्वळ संभ्रम निर्माण करणारे असल्याचे सांगत आयोगाने ते फेटाळून लावले. २०११ पासून ज्या शाईचा वापर निवडणुकांमध्ये केला जात आहे, त्याच शाईचा वापर सध्या सुरू आहे. फक्त यावेळी ती मार्कर पेनच्या स्वरूपात उपलब्ध आहे. त्यामुळे गैरसमज पसरवू नयेत, असे आयोगाने स्पष्ट केले.

आयोगाच्या माहितीनुसार, विधानसभा व लोकसभा निवडणुकांदरम्यानही अशा तक्रारी समोर आल्या होत्या. मात्र शाई पूर्णपणे सुकल्यानंतर ती काढणे शक्य नसते. सध्या कोरस कंपनीचे मार्कर पेन वापरण्यात येत असून, २०११ पासून एकाच कंपनीची शाई वापरली जात असल्याचेही आयोगाने नमूद केले. दरम्यान, मतदान प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या वादांमुळे राजकीय वातावरण तापले असताना, राज्य निवडणूक आयोगाच्या या खुलाशानंतर आरोप-प्रत्यारोपांना आळा बसेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हँडवॉशने शाई निघते का? हँडवॉश किंवा इतर रसायनांच्या वापराने शाई निघते, असा दावा पत्रकारांनी विचारला असता आयोगाने तो स्पष्ट शब्दांत फेटाळला. आमच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही मतदान केले असून त्यांच्या बोटावरील शाई अद्याप तशीच आहे. ती पुसलेली नाही, असे आयोगाने सांगितले.

मतदारांना कडक इशारा दुबार मतदानाबाबत निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेतली आहे. शाई एकदा ड्राय झाली की ती निघत नाही. मतदारांनी जाणीवपूर्वक शाई पुसण्याचा प्रयत्न करू नये. शाई सुकण्यासाठी काही वेळ लागतो. त्याआधीच शाई पुसण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित मतदारावरही गुन्हा दाखल होऊ शकतो, असा कडक इशारा आयोगाने दिला आहे.

# महापालिका निवडणुकीत बोटावरची शाई नाही लोकशाही पुसली जातेय

## निवडणुकीतील घोळावरून उद्धव ठाकरे यांचा घणाघात

**मुंबई, ता. १५ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका निवडणुकीतील गोंधळ आणि गैरप्रकारांवरून निवडणूक आयोग आणि सरकारला धारेवर धरले. हा लोकशाहीचा खून करण्याचा प्रकार आहे. मोदींना जे वन-नेशन वन-इलेक्शन पाहिजे ते एवढ्याचसाठी पाहिजे की, एकावेळेला सगळीकडे गोंधळ घालून वाट्टेल ते करा पण सत्ता काबीज करा.

आज देखील काही ठिकाणी दुबार नोंदणीची नावं समोर येत आहेत. काहींची मतदान केंद्रे गायब आहेत. शाई पुसली जातेय. ही बोटावरची शाई नाही लोकशाही पुसली जातेय, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान होत असताना अनेक ठिकाणी मोठा गोंधळ उडाला आहे. यावर उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. हा लोकशाहीचा खून करण्याचा प्रकार आहे. मोदींना जे वन नेशन वन इलेक्शन पाहिजे ते एवढ्याचसाठी पाहिजे की एकावेळेला सगळीकडे गोंधळ घालून वाट्टेल ते करा पण सत्ता काबीज करा. लोकसभा आणि विधानसभेच्या वेळेला कळलं. त्याच्यानंतर दुबार मतदारांचे आम्ही गठ्ठेच्या गठ्ठे त्यांना



दिले. त्यानंतरही आज देखील काही ठिकाणी दुबार नोंदणीची नावं समोर येत आहेत. काहींची मतदान केंद्रे गायब आहेत. शाई पुसली जातेय. ही बोटावरची शाई नाही लोकशाही पुसली जातेय, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

साधारणतः मतदानाचा दिवस आणि मतमोजणीचा दिवस हे दोन्ही वेगळे दिवस असतात. फार पूर्वी मतदान झाल्यानंतर तत्काळ मतमोजणीला सुरुवात व्हायची. आणि मध्यरात्री किंवा दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत मतमोजणीचे निकाल जाहीर व्हायचे. जोपर्यंत मतदान होत नाही तोपर्यंत मतपेट्या उघडल्या जात नाहीत. त्यात पोस्टलसुद्धा आले, असे सांगत उद्धव ठाकरे यांने निवडणूक अधिकाऱ्याच्या आदेशाचे एक पत्र समोर आणले. निवडणूक निर्णय अधिकारी प्रभाग क्रमांक २०० ते २०६ यांचे ८ जानेवारी २०२६ चे पत्र आहे. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी सुरळीतपणे पार पाडण्या करता उक्त दिनांकास झालेले टपाली मतदान हे मतदानाचा लिफाफा तपासून त्यांनी१५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी तीन वाजता सदर टपाली मतपत्रिकेच्या पेट्या स्ट्राँग रुममधून बाहेर काढण्यात येणार आहे. तरी त्या करता आपण किंवा टपाली मतपत्रिके करिता नेमणूक कलेला प्रतिनिधी यांन नमूद वेळेत उपस्थित राहण्याकरिता आपल्या सर्वांना सूचना देण्यात याव्यात, असे या आदेशात म्हटल्याचे उद्धव ठाकरे यांनी समोर आणले.

## पुण्यात औषध वितरकाची साडेतीन कोटींची फसवणूक

**पुणे, ता. १५ :** सदाशिव पेठेतील एका औषध वितरकाची तीन कोटी ५४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी एका महिलेसह साथीदाराविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. औषध वितरकाने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार औषध वितरकाचे सदाशिव पेठेत दुकान आहे.

आरोपींनी औषध वितरकाकडून २०२४ मध्ये तीन कोटी ५४ लाख रुपयांची औषधे खरेदी केली होती. औषध खरेदी व्यवहारातील पैसे नंतर देतो, असे सांगितले होते. औषध घेतल्यानंतर आरोपींनी त्यांना पैसे परत केले नाहीत. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर वितरकाने नुकतीच पोलिसांकडे फिर्याद दिली. सहायक पोलीस निरीक्षक जानराव तपास करत आहेत.

## संक्षिप्त

### निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर निवेदिता सराफ भडकल्या



**मुंबई, ता. १५ :** महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) सकाळपासून मतदान सुरू आहे. मात्र निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांसह सेलिब्रेटीही हैराण झाले आहेत. मराठी अभिनेत्री निवेदिता सराफ यांना देखील हा मनस्ताप सहन करावा लागला. मतदार यादीतील गोंधळामुळे निवेदिता सराफ यांना एक तास या केंद्रावरून त्या केंद्रावर चकरा मराव्या लागल्या. याबाबत निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारावर त्यांनी संताप व्यक्त केला आहे. मी विलेपार्ले येथील मतदान केंद्रावर मतदानासाठी गेले होते. मात्र तेथे माझे नावच मतदार यादीत नव्हते. त्यांनी मला २५ नंबरला जाण्यास सांगितले. तेथे गेले तोवर निवडणूक कर्मचारी गेली होती. प्रत्येक सोसायटीचे गट पाडले असून त्या गटातील मतदार या मतदान केंद्रात येऊन मतदान करतील असे ठरवले आहे. मात्र आमच्या बिल्डिंगची नावे का नाहीत? नाव आहे तर सिरीज नंबरच नाही. मोबाईल आतमध्ये नेऊ देत नाही, नाहीतर फोटो काढला असता, अशी संतप्त प्रतिक्रिया निवेदिता सराफ यांनी दिली.

### कोथरूड, कात्रज भागात घरफोडी

**कोथरूड, ता. १५ :** कोथरूड, कात्रजमधील आंबेगाव परिसरात झालेल्या घरफोडीत चोरट्यांनी तीन लाख १० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कात्रजमधील आंबेगाव बुद्रुक परिसरात घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना उघडकीस आली. याबाबत एकाने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार हे आंबेगावमधील जांभूळवाडी रस्त्यावर असलेल्या केंदुळकर निवास इमारतीत राहायला आहेत. चोरट्यांनी मंगळवारी ( जानेवारी) दुपारी घराचे कुलूप तोडून कपाटातील अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविले. पोलीस उपनिरीक्षक कळमकर तपास करत आहेत. कोथरूडमधील आत्रेय सोसायटीत असलेल्या सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी ६० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना उघडकीस आली. याबाबत एका महिलेने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला वारजे भागात राहायला आहेत. त्यांचे आई-वडील आत्रेय सोसायटीत राहायला आहेत. चोरट्यांनी १२ जानेवारी रोजी सदनिकेचे कुलूप तोडून ऐवज लांबविल्याची घटना घडली. पोलीस हवालदार माळी तपास करत आहेत.

### जमीन बळकाविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**पुणे, ता. १५ :** महिलेची जमीन बळकाविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका सराइताविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, वाघू तुकाराम हळंदे (रा. वारजे) याच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रादार महिला धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात राहायला आहेत. महिलेच्या पतीचे निधन झाले आहे. महिलेच्या पतीने एकाकडून वडगाव बुद्रुक भागातील सिंहगड महाविद्यालयाच्या परिसरातील ८५० चौरस फुट जागा खरेदी केली होती. खरेदीचा कायदेशीर व्यवहार झाला होता. गुंड गजानन उर्फ गजा मारणे टोळीतील सराइत हळंदे याने जमीन बळकाविण्याचा प्रयत्न केला. महिला आणि तिच्या कुटुंबीयांना तेथे येण्यास मनाई केली. त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली, असे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने तपास करत आहेत.

### येवलेवाडीत एक लाखांची रोकड सापडली

**कोंढवा, ता. १५ :** कोंढव्यातील येवलेवाडी भागात दोन मोटारीतून भरारी पथकाने एक लाखांची रोकड, लिफापे, वह्या असा मुद्देमाल जप्त केला. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येवलेवाडी पोलिसांचे गस्त घालत होते. त्यावेळी खडी मशीन चौकातून निघालेल्या दोन मोटारींची तपासणी करण्यात आली. तपासणीत मोटारीतून एक लाखांची रोकड, वह्या, लिफापे जप्त करण्यात आले. पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर, सहायक आयुक्त नम्रता देसाई, सहायक आयुक्त अनुराधा उदमले, येवलेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्ष अमर काळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने ही कारवाई केली.

### थेरगावात ईव्हीएम यंत्रणा ठप्प; प्रभाग क्रमांक २३ मध्ये मतदारांची मोठी गैरसोय

**पिंपरी, ता. १५ :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मतदानादरम्यान थेरगाव येथील प्रभाग क्रमांक २३ मध्ये ईव्हीएम मशीन बंद पडल्याने मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली आहे. यशवंतराव चव्हाण शाळेतील मतदान केंद्रात खोली क्रमांक ८ आणि ९ मधील ईव्हीएम यंत्रणा मागील एक तासापासून बंद असल्याने मतदारांची मोठी गैरसोय होत आहे. यशवंतराव चव्हाण शाळेतील बूथ क्रमांक २४ येथे ईव्हीएम मशीन अचानक बंद पडल्यामुळे मतदान काही काळासाठी पूर्णपणे थांबवावे लागले. या घटनेमुळे मतदान केंद्राबाहेर शेकडो मतदार रांगेत उभे असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कामावर जाणाऱ्या मतदारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाघोली पोलिसांची कारवाई

## २३ लाखांचा बेकायदा विदेशी मद्यसाठा जप्त

**पुणे, ता. १५ :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात बेकायदा मद्यविक्री व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. त्याचाच भाग म्हणून वाघोली पोलिसांनी विनापरवाना परदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई करत सात हजार ४४१ विदेशी मद्याच्या बाटल्या व टेम्पो असा एकूण २३ लाख ७३ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी टेम्पो चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. कपील दिगंबर साहू (वय २६, रा. केसनंद, मूळ रा. मुखेड, जि. नांदेड) असे ताब्यात घेण्यात आलेल्या चालकाचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. १३) वाघोली पोलीस गस्त घालत असताना वाघोली केसनंद रस्त्यावरून पांढऱ्या रंगाच्या टेम्पोतून विनापरवाना परदेशी मद्याची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक मनोज बागल यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचून संबंधित टेम्पो अडवून तपासणी करण्यात आली. टेम्पोच्या पाठीमागील भागावर काळ्या रंगाची ताडपत्री लावण्यात आली होती. ती काढून पाहिली असता मोठ्या प्रमाणात परदेशी मद्याच्या बाटल्यांनी भरलेली खोकी आढळून आली.

ही कारवाई अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे, उपनिरीक्षक मनोज बागल तसेच पोलीस कर्मचारी बाबासाहेब मोराळे, राम ठोंबरे, प्रदीप मोटे, मंगेश जाधव, समीर भोरडे व पांडुरंग माने यांनी केली. या प्रकरणी पुढील तपास वाघोली पोलीस करत आहेत.

## भरधाव टेम्पोची दुचाकीला धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू; चालक फरार

**विशाल शिंदे**

भोर, ता. १५ : सातारापुणे महामार्गावर वेळ (ता. भोर) गावच्या हद्दीत मंगळवारी (दि. १४) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पो चालक घटनास्थळावरून फरार झाला असून या प्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात गणपत पांडुरंग इमडे (वय ३७, रा. स्मृती व्हिला, फेज-३, फ्लॅट नं. ४०३, खोपडे नगर, गुजरवाडी, पुणे; मूळ रा. शिकारा, ता. मुखेड, जि. नांदेड) यांचा मृत्यू झाला. याबाबत त्यांचे भाऊ शंकर पांडुरंग इमडे (वय ४०, व्यवसाय शेती, रा. शिकारा, ता. मुखेड, जि. नांदेड) यांनी तक्रार दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हुंडाई शोरूमसमोर सातारापुणे महामार्गावर आरोपी विवेक विजय गवळी (रा. आण्णाभाऊ साठे चौक, रामनगर बाड, वारजे माळवाडी, पुणे) हा त्याच्या ताब्यातील तीनचाकी टेम्पो साताऱ्याकडून पुण्याच्या दिशेने भरधाव व निष्काळजीपणे चालवत होता. रहदारी नियमांचे उल्लंघन करत टेम्पोने पुण्याकडे निघालेल्या गणपत इमडे यांच्या शाईन दुचाकीला जोरदार धडक दिली.

या धडकेत गणपत इमडे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पो चालकाने कोणतीही मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरून पलायन केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या प्रकरणाचा पुढील तपास राजगड पोलीस करत आहेत.

## निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने ५ पोलिसांचे निलंबन; पिंपरी-चिंचवड पोलिसांची कारवाई

**पिंपरी-चिंचवड, ता. १५ :** निवडणूक काळात कर्तव्यावर गैरहजर राहिल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील पाच पोलिस कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. बुधवारी (ता. १४) रात्री उशिरा पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी हे निलंबनाचे आदेश जारी केले असून, या कारवाईमुळे पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अशा संवेदनशील काळात काही कर्मचारी कर्तव्यावर अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये संजय केळकर, सागर बाविस्कर, जगन्नाथ शिंदे, प्रतिभा गावडे आणि संतोष जाधव यांचा समावेश आहे. हे सर्व कर्मचारी निगडी येथील पिंपरी-चिंचवड पोलिस मुख्यालयात कार्यरत होते.

गुरुवारी पीसीएमसीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. त्याआधी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव, आळंदी आणि चाकण नगरपरिषदांच्या निवडणुकाही पार पडल्या होत्या. सलग निवडणुकांमुळे पोलिस यंत्रणेवर मोठा ताण होता आणि प्रत्येक कर्मचाऱ्याची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची ठरली होती. दरम्यान, पीसीएमसी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रमुख राजकीय नेते शहरात दाखल झाल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मर्यादित मनुष्यबळावरच सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असताना, काही कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती गंभीर बाब मानण्यात आली आहे.

निलंबित करण्यात आलेले पाचही कर्मचारी काही महिन्यांपूर्वी रजेवर गेले होते. त्यानंतर पोलिस मुख्यालय व आयुक्तालयाकडून त्यांना वारंवार कर्तव्यावर हजर राहण्याच्या सूचना व पत्रे पाठविण्यात आली होती. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शिस्तभंगाची कडक भूमिका घेत पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी पाचही कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित केले आहे. कर्तव्यावर गैरहजर राहिल्याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरूच राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी ओंकार कामठे यांची बाजी

**फुरसुंगी, ता. १५ :** फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओंकार मच्छिंद्र कामठे यांनी २० विरूद्ध ८ मतांनी विजय मिळवला. गुरुवारी (ता. १५) नगराध्यक्ष संतोष फकीरा सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली हि निवडणूक पार पडली. यावेळी निवडणूक सहायक म्हणून मुख्याधिकारी प्रसाद शिंगटे यांनी काम पाहिले.



फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी गुरुवारी सकाळी नगराध्यक्ष संतोष सरोदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ओंकार कामठे व शिवसेनेच्या नगरसेविका राणी बाळासाहेब हरपळे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे अर्ज सुपूर्द केला होता. विहित कालावधीमध्ये उपनगराध्यक्ष पदासाठी छाननी प्रक्रियेत दोन्ही अर्ज वैध राहिल्याने व कुणीही माघार न घेतल्याने निवडणूक होणार हे निश्चित झाले.

या मतदानात भाजपाचे ५ नगरसेवक गैरहजर राहिले होते. उपनगराध्यक्ष निवडणुकीत १९ मते व नगराध्यक्षाचे एक मत असे एकूण २० मते ओंकार कामठे यांना मिळाली तर ८ मते राणी बाळासाहेब हरपळे यांना मिळाली.

त्यामुळे ओंकार कामठे यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याचे नगराध्यक्ष संतोष सरोदे यांनी जाहीर केले. ओंकार कामठे यांची निवड होताच कार्यकर्त्यांकडून मोठा जल्लोष केला.

दरम्यान, प्रथमच झालेल्या फुरसुंगी-उरुळी देवाची सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) नगराध्यक्ष पदासह ३२ पैकी १९ जागा जिंकत फुरसुंगी नगरपरिषदेवर आपला झेंडा फडकवला आहे.

# अनेक ठिकाणी ईव्हीएम मशीन बंद रोहित पवारांना वेगळाच संशय

**पुणे, ता. १५ :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. मात्र, काही ठिकाणी ईव्हीएम मशीन सुरु होत नसल्याचे प्रकार समोर आले आहेत. अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती आहे. याबाबत राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत संशय व्यक्त केला आहे.

रोहित पवार यांनी पोस्ट शेअर करत लिहिले की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यात अनेक ठिकाणी मतदानाची सुरवातच बंद मशीनने झाली, तर अनेक ठिकाणी एव्हीएम वरील वेळ सुमारे १५ मिनिटे उशिराची दाखवली जातेय, काही ठिकाणी तिसऱ्या उमेदवाराला मत दिल्याचं बटन दाबल्यानंतर लाईट लागते, काही ठिकाणी शेवटचं (चौथं) बटन दाबल्यानंतर आवाज येतो पण लाईट लागत नाही.



एकूणच हे सगळंच संशयास्पद आणि निवडणुकीबाबत अविश्वास निर्माण करणारं आहे. निवडणूक आयोगाने याबाबत स्पष्टीकरण देऊन हा गोंधळ तातडीने दूर करावा आणि मतदान हे मुक्त व निर्भय वातावरणासह मत दिलेल्या उमेदवारांनाच ते गेलं पाहिजे, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही रोहित पवार यांनी पोस्ट द्वारे केले आहे.


# मतदार कुठले, यादी कुठली?; शिरूरच्या पूर्व भागात पुणे महापालिका निवडणुकीचा घोळ

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १५ : पुणे महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर आज सर्वत्र मतदान प्रक्रिया सुरू असतानाच शिरूर तालुक्याच्या पूर्व भागात मोठी खळबळ उडाली आहे. मांडवगण फराटा, तळेगाव ढमढेरे, वडगाव रासाई, इनामगाव, निर्वी, बाभुळसर बुद्रुक आणि तांदळी या गावांतील अनेक ग्रामस्थांची नावे थेट पुणे महानगरपालिकेच्या वाघोली प्रभागाच्या मतदारयादीत समाविष्ट असल्याचे उघड झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मांडवगण फराटा व परिसरात अज्ञात व्यक्तींकडून ठिकठिकाणी फ्लेक्स लावण्यात आले आहेत. या फ्लेक्सवर दुबार मतदान केल्यास किंवा त्यासाठी वाघोली येथे गेल्यास मजबूत चोप देऊन पोलिसी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट आणि आक्रमक इशारा देण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारच्या फ्लेक्सबाजीमुळे शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील गावागावांत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, मांडवगण फराटा ग्रामपंचायत हद्दीतील अनेक मतदारांची नावे ग्रामपंचायत मतदारयादीत असतानाच पुणे महानगरपालिकेच्या वाघोली प्रभागाच्या मतदारयादीतही नोंद




असल्याचा दावा या फ्लेक्समध्ये करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर नावे असल्याचे सांगितले जात असताना फ्लेक्सवर केवळ २५ मतदारांचीच नावे जाहीर करण्यात आल्याने उर्वरित मतदारांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक मतदार ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांचा वाघोलीशी कोणताही प्रत्यक्ष संबंध नसतानाही त्यांची नावे महापालिकेच्या मतदारयादीत कशी नोंदवली गेली, याबाबत नागरिकांनी तीव्र आश्चर्य व्यक्त केले आहे. मोठ्या संख्येने नावे असतानाही मोजक्याच व्यक्तींची नावे जाहीर करून फ्लेक्स लावण्यात आल्याने संभ्रमासोबतच संतापाची भावना अधिक तीव्र झाली आहे.

या सर्व गावांच्या मुख्य चौकात अशा स्वरूपाची बॅनरबाजी करण्यात आली असून दुबार मतदान हा गंभीर व कायद्याने दंडनीय गुन्हा असल्याचे ठळकपणे नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारात कोणीही सहभागी झाल्यास थेट पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी कायद्याचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात चर्चेला उधाण आले असून पुणे महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रशासन व निवडणूक यंत्रणेने या गंभीर बाबीची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संतप्त नागरिकांनी काही ठिकाणी हे फ्लेक्स फाडून टाकल्याच्याही घटना घडल्याने परिस्थिती आणखी संवेदनशील बनली आहे.

जनमानसाचा निडर आवाज... पुणे प्राईम न्यूज



## देशाचे रक्षण करण्यात सैनिकांची भूमिका अतुलनीय; मोदींचा सैन्याच्या शौर्याला सलाम

**नवी दिल्ली, ता. १५ :** देशभरात गुरुवारी (ता.१५) लष्कर दिन साजरा केला. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय सैन्याला आदरांजली वाहिली. त्याच्यासोबतच त्यांनी सैन्याच्या धैर्य, शौर्य आणि बलिदानाचे कौतुक केले. पंतप्रधानांनी याविषयी बोलताना, भारतीय सैन्याचे समर्पण आणि शौर्य ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची गोष्ट आहे आणि देशाचे रक्षण करण्यात सैनिकांची भूमिका अतुलनीय आहे. असे म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर लष्कर दिनानिमित्त एक विशेष संदेश शेअर केला. त्यांनी लिहिले की, दुर्गम पर्वतांपासून ते बर्फाच्छादित शिखरांपर्यंत भारतीय सैन्याचे धैर्य आणि शौर्य देशाला अभिमानास्पद आहे असे म्हटले. त्यांनी सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना मनापासून सलाम



केला आणि त्यांच्या बलिदानाला आदरांजली वाहिली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की भारतीय सैनिक निःस्वार्थ सेवा आणि समर्पणाचे प्रतीक आहेत. ते सर्वात कठीण परिस्थितीतही मातृभूमीचे रक्षण करण्यात दृढ राहतात. ते म्हणाले की सैनिकांची शिस्त, धैर्य आणि दृढनिश्चय देशभरात सुरक्षा आणि आत्मविश्वासाची भावना मजबूत करते. पंतप्रधानांनी आपल्या संदेशात देशाचे रक्षण करताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी म्हटले की, अशा वीरांना राष्ट्र नेहमीच आदर आणि कृतज्ञतेने आठवते.

१५ जानेवारी रोजी लष्कर दिन का साजरा केला जातो? भारतात दरवर्षी १५ जानेवारी रोजी लष्कर दिन साजरा केला जातो. हा दिवस भारतीय लष्करी इतिहासातील एका महत्त्वाच्या घटनेशी संबंधित आहे. १९४९ मध्ये या दिवशी फील्ड मार्शल के.एम. करिअप्पा यांनी भारतीय लष्कराचे पहिले भारतीय कमांडर-इन-चीफ म्हणून पदभार स्वीकारला. ते ब्रिटिश जनरल एफ.आर.आर. बुचर यांच्यानंतर आले. भारतीय लष्कराच्या शौर्य, शिस्त आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

# लोणी काळभोर, कदमवाकवस्ती जिल्हा परिषद गटातून शीतल कांबळे निवडणुकीसाठी इच्छुक

### दर्जेदार शिक्षण, आरोग्य, शेतकरी हित व महिला सक्षमीकरणावर भर

**लोणी काळभोर, ता. १५ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ६ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर-कदमवाकवस्ती जिल्हा परिषद गटातून शीतल कांबळे यांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य सुनंदा शेलार आणि लोणी काळभोरचे माजी सरपंच चंदर शेलार यांच्या पाठिंब्याने शीतल कांबळे या निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. त्यांचे सासरे प्रल्हाद कांबळे हे अनेक वर्षांपासून समाजकारणात सक्रिय होते. पती ॲड. सुजित कांबळे हेही सामाजिक कार्यात सक्रीय आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात शीतल कांबळे या प्रबळ उमेदवार मानल्या जात आहेत.

पुणे प्राईम न्यूजशी संवाद साधताना शीतल कांबळे यांनी आपल्या विकासात्मक भूमिकेची माहिती दिली. त्या म्हणाल्या, माझ्या गटातील वाहतूक कोंडीची समस्या, जिल्हा परिषदेच्या शाळा अधिक चांगल्या व सुसज्ज करणे आणि विशेषतः शिक्षणाचा दर्जा उंचावणे यावर माझा भर राहील. आपण १२ वर्षे शिक्षिका म्हणून काम केल्याचा अनुभव सांगत त्या पुढे म्हणाल्या की,



विद्यार्थी हा सुशिक्षित समाजाचा मुख्य घटक आहे. मुलांनी शिक्षण घेतल्यास कुटुंब आणि समाजाचा विकास होतो. मात्र आर्थिक अडचणींमुळे पालक मुलांना कामावर पाठवतात, त्यामुळे या भागात शालेय गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे, ही गंभीर समस्या आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत बोलताना त्या म्हणाल्या, या गटातील शेतकऱ्यांना विविध शेतीविषयक योजनांची माहिती देणे, डुप्लिकेट बियाणांबाबत जागरूकता निर्माण करणे हे माझे प्राधान्य असेल. तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून कुटीर उद्योग उभारून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

या भागातील सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी जिल्हा परिषदेच्या निधीतून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व आवश्यक मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेने संधी दिल्यास माझा कारभार पारदर्शक राहील. भ्रष्टाचारमुक्त कारभार करण्याचा माझा ठाम निर्धार आहे, असे सांगत दर्जेदार शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि शेती या विषयांवर प्राधान्याने काम करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मायबाप जनता आपल्या पाठीशी उभी राहील, असा विश्वासही शीतल कांबळे यांनी व्यक्त केला.

## मार्करच्या मुद्यावरून राज ठाकरे संतापले; फडणवीसांनी लगावला टोला

**मुंबई, ता. १५ :** राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान होत असून यादरम्यान, एक धक्कादायक प्रकारसमोर आला आहे. मतदान करुन आलेल्या काही नागरिकांच्या बोटावरील शाई पुसली जात असल्याने एकच खळबळ उडाली आहे. यावरून मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी संताप व्यक्त करत सरकार आणि निवडणूक प्रशासन हे एक प्रकारे निवडणुका जिंकण्यासाठी लोकशाहीचा गळा घोटत असल्याचे म्हंटले आहे.

सरकारने निवडणुका जिंकायचे ठरविले आहे. जे विधानसभेला केले ते आता करत आहे पण आम्ही होऊ देणार नाही. आजपर्यंत शाई लावली जायची, पण आता मार्करने खूण करण्यात येत आहे. सॅनिटाईजरने ही खूण पुसली जातेय. फ्रॉड निवडणुकांमधून सत्तेत




येणे, याला निवडणुका म्हणत नाही, मतदानासाठी शाईऐवजी पेन वापरले जात आहेत, ज्याची शाई सहज पुसली जातेय. लोक बाहेर येतात, शाई पुसतात आणि पुन्हा आत जाऊन मतदान करतात. यालाच सरकार विकास म्हणते का? सध्याची सिस्टीम ही केवळ विरोधकांना संपवण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांना जिंकवण्यासाठी काम करत आहे, असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी केला.

या प्रकरणावर आणि राज ठाकरेंनी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या सर्व गोष्टी इलेक्शन कमिशन ठरवतात याआधीही अनेक वेळा मार्कर पेन वापरण्यात आला आहे. जर कोणी याबाबत आक्षेप घेत असेल तर इलेक्शन कमिशनने या संदर्भात लक्ष दिले पाहिजे. मी तर म्हणतो की, ऑईल पेंटचा वापर केला पाहिजे. मात्र निवडणुकीशी संबंधित संस्थानवर अशा पद्धतीने संशय निर्माण करणे योग्य नाही, पण मला असं वाटतं की काही लोक उद्याच्या निकालाचा अंदाज लावून आजपासूनच काही गोष्टींवर मुद्दाम भाष्य करत आहेत. उद्याचा निकाल आल्यानंतर कशाला दोष द्यायचा याची तयारी करत आहेत हे यातून स्पष्ट दिसून येत आहेत, असा खोचक टोला फडणवीसांनी लगावला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये महानगरपालिकेसाठी मतदान केले. यावेळी त्यांची पत्नी अमृता फडणवीस देखील सोबत होत्या. मतदानानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मतदानात मार्करने शाई लावण्याच्या वादावर भाष्य केले.

## महापालिकांचे मतदान संपण्यापूर्वीच दादांचा जिल्हा परिषदेवर डोळा

### ७ फेब्रुवारीला विजयाचा गुलाल उधळण्यासाठी अजित पवारांची ‘यंत्रणा’ सज्ज

**पुणे, ता. १५ :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत असतानाच, उद्या १६ जानेवारी रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराचा नारळ फोडत बारामतीत कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या या बैठकीत अजित पवारांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सविस्तर माहिती देत कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याचे आवाहन केले.

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र ५० टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी काही जिल्ह्यांमध्ये अडचणी असल्याने पहिल्या टप्प्यात १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, धाराशिव आणि परभणी या जिल्ह्यांचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार १६ ते २१ जानेवारीदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. २२ जानेवारी रोजी छाननी, २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असून ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. अवघ्या आठ दिवसांच्या प्रचारानंतर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होऊन सर्व निकाल जाहीर केले जातील.

अजित पवार यांनी बारामती आणि माळेगाव नगरपरिषद निवडणुकांतील यशाचा उल्लेख करत कार्यकर्त्यांचे आभार मानले. बारामती नगरपरिषदेत ४१ पैकी सुमारे ३५ जागा राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी जिंकल्या असून अपक्ष निवडून आलेल्या तीन नगरसेवकांनीही सत्ताधारी गटाला पाठिंबा दिला आहे. उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत बोलताना त्यांनी पाच वर्षांत पाच जणांना संधी देण्याचे धोरण जाहीर केले. स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत नवीन नियम लागू झाल्याचे सांगत, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना संधी देण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राच्या सत्ताकेंद्राची चाचणी असून, या निवडणुकांमधून आगामी विधानसभा आणि लोकसभा रणनितीची दिशा ठरणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काही आठवड्यांत राज्यात राजकीय वातावरण अधिक तापलेले दिसणार आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. ‘पुणे प्राईम न्यूज’ मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे ‘पुणे प्राईम न्यूज नेटवर्क’चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## हॉटेलसारखे पराठे घरी होत नाहीत, चला तर मग फॉलो करा या टिप्स

**पुणे, ता. १५ :** पराठे म्हणजे पोटभरीचा नाष्टा. परंतु हॉटेलसारखे मस्त पराठे मात्र घरी काही केल्या होत नाहीत. बरेचदा घरी करण्यात येणारे पराठे फसतात. यावरही काही साध्या सोप्या टिप्स आपण वापरुन हॉटेलसारखे पराठे अगदी घरच्या घरी सहज बनवु शकतो. स्वादिष्ट आणि मऊ पराठे बनवण्यासाठी पीठ योग्य प्रकारे तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरता आपण पाहणार आहोत पराठे करण्यासाठीच्या योग्य टिप्स.

प्रथम, गव्हाचे पीठ घ्या आणि त्यात चवीनुसार थोडे मीठ घाला. नंतर, दोन चमचे तेल किंवा तूप घाला, ज्यामुळे पीठ मऊ आणि गुळगुळीत होते. आता, हळूहळू पीठात पाणी घाला आणि ते चांगले मळून घ्या. पीठ खूप कठीण किंवा खूप सैल नसल्याची खात्री करा. मळल्यानंतर, पीठ थोडा वेळ झाकून ठेवा, ज्यामुळे पराठे आणखी मऊ होतील. पीठ मळल्यानंतर लगेच पराठे बनवण्याची चूक करू नका. उत्तम पराठे होण्यासाठी पीठ १० ते १५ मिनिटे झाकून ठेवणे महत्वाचे आहे. यामुळे पीठ चांगल्या प्रकारे मुरते. असे मुरलेले पीठ पराठे बनवण्यासाठी सर्वात बेस्ट मानले जाते. पराठे लाटताना, योग्य प्रमाणात पीठ वापरणे अत्यंत आवश्यक आहे. पीठाचे छोटे गोळे बनवुन पराठे लाटायला सुरुवात करावी. पराठे लाटताना हलक्या हाताने लाटावेत. हलक्या हातांनी लाटल्याने पराठे गोल बनतात. तसेच पराठा व्यवस्थित सर्व बाजूंनी भाजला जातो.

पराठे लाटताना हलके तेल आणि थोडे कोरडे पीठ लावावे. पराठे मसालेदार आणि वेगळे बनवायचे असतील तर ते गुंडाळण्यापूर्वी मसाले वापरा. यासाठी, पराठ्यावर लाल तिखट, चाट मसाला, ओवा, धणे पावडर, एका जातीची बडीशेप पावडर आणि कसुरी मेथी भुरभुरावी. त्यानंतर पराठा घडी करावा. हा पराठा भाजल्यावर, चवदार लागतो. तसेच हा पराठा दही किंवा लोणच्यासोबत खाण्याचा एक वेगळा आनंद असतो. पराठा स्वादिष्ट बनवण्यासाठी पराठे नेहमी मध्यम आचेवर बेक करावेत. त्यानंतर त्यावर तेल किंवा तूप लावावे.

# परदेशी पाहुण्यांच्या आगमनाने बहरतोय उजनीकाठ; पाणलोट क्षेत्रात समुद्रपक्ष्यांची हिवाळी स्वारी

संतोष पवार

इंदापूर, ता. १५ : उजनीकाठ व धरण पाणलोटक्षेत्र परिसर विदेशी व समुद्री पक्ष्यांच्या आगमनामुळे निसर्गप्रेमी व पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू बनत चालला आहे. गतवर्षीच्या झालेल्या अतिवृष्टीमुळे व धरण अद्याप तुडुंब भरून असल्यामुळे आपले आगमन लांबणीवर टाकलेले स्थलांतरित समुद्रपक्षी (सी गल्स) उजनीवर येऊन आता दाखल होऊ लागले आहेत. पळसदेवसह डिकसळ रेल्वेपूल परिसर, कोंढार चिंचोली, टाकळी, कात्रज, पोमलवाडी, केतूर, काळेवाडी, पळसदेव आदि उजनीच्या काठावरील गावांच्या विस्तृत पाणवठ्यावर मासेमारी करत



तरंगताना दिसत आहेत.

दक्षिण रशिया, पूर्व मंगोलिया, पॉलिआर्क्टिक, हिमालयातील मानसरोवर तसेच लडाख भागातील सरोवराला वीणीसाठी जाणारे व सागरी किनाऱ्यावर मासेमारी करणारे विविध प्रजातींचे गलपक्षी उजनी जलाशयावर दरवर्षी हिवाळ्यात येतात. त्यापैकी ब्लॅक हेडेड गल पक्षी मागील आठवड्यात येऊन दाखल झाले आहेत.

गल या हिवाळी पाहुण्या पक्ष्यांना समुद्रपक्षी, केगो व कीर या नावानेही ओळखतात. आकाराने ब्राह्मणी घारीएवढे असलेले ब्लॅक हेडेड गल पक्षी उजनीवर येण्यापूर्वी पांढरेशुभ्र वाटतात; परंतु काही दिवसांत त्यांच्या डोक्यावर काळा डाग तयार होतो.

> स्थलांतरित पक्ष्यांची पंढरी म्हणून ख्याती असलेल्या उजनी धरणाच्या विस्तृत पाणफुगवट्यावर स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात येण्यास प्रारंभ करतात. नेहमी हिवाळ्याच्या प्रारंभी येणारे समुद्रपक्षी यंदा दीड महिना उशीराने दाखल झाले आहेत. आता त्यापाठोपाठ अनेक प्रकारचे बदक, मत्स्याहारी पक्षी येऊन दाखल होत असल्याने उर्वरित पक्षी येण्याचे शुभसंकेत मिळाले आहेत.
> - **डॉ. अरविंद कुंभार,** ज्येष्ठ पक्षीअभ्यासक

परतीच्या प्रवासाच्या वेळी म्हणजे उन्हाळ्यापूर्वी डोक्याचा रंग तपकिरी होतो. या पक्ष्यांमध्ये पंखांचा अग्रभाग पांढराशुभ्र असतो व त्यांची किनार गडद काळसर असतो. चोच पिवळ्या रंगाची असून तिचे टोक काळ्या रंगाची असते. हे पक्षी दिवसभर पाण्याच्या पृष्ठभागावर अविरतपणे तरंगत राहत पाण्यात खोलपर्यंत बुडून माशांची शिकार करतात.

उजनी धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरलेले असून माशांच्या निकोप वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. या माशांवर उदरनिर्वाह करण्यासाठी गल पक्ष्यांबरोबर विविध प्रकारचे बदक येऊन दाखल होतील असा अंदाज आहे. एरवी खाऱ्या पाण्यातील माशांची चव चाखण्यासाठी व्यस्त असणारे हे मत्स्याहारी पक्षी उजनीतील गोड्या पाण्यातील माशांवर डल्ला मारण्यात सक्रिय झाल्याचे पाहून पक्षीनिरीक्षकांत उत्साह संचारला आहे.

## एम्पॉवर अबॅकस अकॅडमीच्या राष्ट्रीय स्पर्धेत फास्ट ब्रेन्सची झलक; सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**पुणे, ता. १३ :** लहान बोटांवरून वेगाने धावणारी गणिती गणना, तीक्ष्ण स्मरणशक्ती आणि अचूकतेचा आत्मविश्वास यांचा प्रत्यय देणारी नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशन २०२६ एम्पॉवर अबॅकस अकॅडमी, पुणे यांच्या वतीने वाघोली येथील श्रेयश बँक्वेट हॉलमध्ये उत्साहात पार पडली.

एम्पॉवर अबॅकस अकॅडमीच्या संस्थापक सुवर्णा महेश खोत व महेश अशोक खोत यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातून ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला, तर ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. काही विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच मिनिटांत १०० ते १४४ पर्यंत गुण मिळवून आपली विलक्षण




गणनाक्षमता सिध्द केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब सातव सर (शिक्षण अधिकारी, राज्यप्रमुख राष्ट्रवादी ज्येष्ठ नागरिक संघ) होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मालती (ताई) गोगावले, गणेश (शेठ) गोगावले, शरद सुकाळे (मेजर), प्रितेश तराळ, राजेंद्र गावडे, अमित हरगुडे, विधात्री त्रिवेदी, प्रभाकर जाधव, डॉ. सारंग जोशी, श्रीकांत गावडे व भाग्यश्री वडगावे उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसोबतच मार्गदर्शक शिक्षकांनाही उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्टेजवर अबॅकसचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. एम्पॉवर अबॅकस अकॅडमीची एक वेगळी ओळख म्हणजे शिक्षकांसाठी असलेली सामाजिक बांधिलकी. कोणतीही फ्रेंचाईजी फी न घेता शिक्षकांना व्यावसायिक अबॅकस प्रशिक्षण देऊन स्वतःचे कोचिंग सेंटर सुरू करण्याची संधी संस्था उपलब्ध करून देते. शिक्षणाच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात अबॅकस शिक्षणामुळे मेंदूची गती, एकाग्रता, स्मरणशक्ती व आत्मविश्वास वाढतो, असे नमूद करत पालकांनी अशा शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले. एम्पॉवर अबॅकस अकॅडमी राज्यभर व देशभर ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत असून हजारो विद्यार्थी या संस्थेत प्रशिक्षण घेत आहेत.




## शाई पुसून पुन्हा मतदान?; निवडणूक आयोगाचा 'मार्कर' ठरला फ्लॉप

**पुणे, ता. १५ :** मतदान केलं, पण पुरावा काय? असा प्रश्न आज महाराष्ट्रभरातील अनेक मतदान केंद्रांवर विचारला जात आहे. बोगस आणि दुबार मतदानाला रोखण्यासाठी अस्त्र म्हणून वापरली जाणारी 'शाई' चक्क पुसली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबई, ठाणे, पुणे ते छत्रपती संभाजीनगरपर्यंत सर्वत्र या 'मार्कर' शाईमुळे राजकीय पक्षांनी संताप व्यक्त केला आहे.

गेल्या अनेक दशकांपासून मतदानासाठी बाटलीतील शाई आणि ब्रशचा वापर केला जात असे, जी एकदा बोटावर लागली की आठवडाभर निघत नसे. मात्र, यंदा निवडणूक आयोगाने 'मार्कर पेन' स्वरूपात शाई उपलब्ध करून दिली. अनेक केंद्रांवर शाई लावल्यानंतर काही सेकंदातच ती पुसली जात असल्याचा अनुभव मतदारांना आला. नेलपेंट रिमूव्हर, हँड सॅनिटायझर किंवा हाताला घाम असल्यास ही शाई लगेच निघून जात आहे. पुण्यात तर काही ठिकाणी मुलं आणि महिला लिक्विडचा वापर करून शाई पुसून पुन्हा मतदानासाठी रांगेत उभे राहत असल्याचा गंभीर आरोप उमेदवारांनी केला आहे. जर असच चालल तर निवडणुका पारदर्शक कश्या होणार? असा संतप्त सवाल विरोधकांनी विचारला आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अडखळली; दोन वर्षांत २० टक्के उद्दिष्टही अपूर्णच

**पुणे, ता. १५ :** शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळावा आणि उद्योगव्यवसायांना स्वस्त वीज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मोठ्या अपेक्षांनी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजना प्रत्यक्षात मात्र अडचणींचा सामना करताना दिसत आहे. योजनेला दोन वर्षांचा कालावधी उलटून गेला असतानाही एकूण उद्दिष्टाच्या २० टक्केही काम पूर्ण न झाल्याने सरकारच्या महत्त्वाकांक्षी दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील विजेचा खर्च कमी करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा नियमित वीजपुरवठा देणे, या उद्दिष्टांसाठी ही योजना राबवण्यात येत असल्याचे स्पष्ट केले होते. या योजनेअंतर्गत ०.५ ते २५ मेगावॉट क्षमतेच्या कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रांपासून ५ ते १० किलोमीटर परिसरात विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यभरात सुमारे १७ हजार मेगावॉट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात आतापर्यंत केवळ ३ हजार ३०० मेगावॉट क्षमतेचेच प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

महावितरणने मार्च २०२४ मध्ये ९ हजार १५६ मेगावॉट क्षमतेच्या सुमारे दोन हजार सौर प्रकल्पांसाठी विविध कंपन्यांना कंत्राटे दिली होती. या प्रकल्पांमधून महावितरणला ३.०९



रुपये प्रतियुनिटपेक्षा कमी दरात वीज मिळणार होती. मात्र सप्टेंबर आणि नोव्हेंबर २०२५ या मुदती संपूनही केवळ १ हजार ६६३ मेगावॉटचेच प्रकल्प पूर्ण झाले आहेत. परिणामी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानासाठी महावितरणला मुदतवाढ मागावी लागली असून, आता मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांनाच अनुदान मिळणार आहे.

या योजनेतून सुमारे ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक, तसेच ७० हजार ग्रामीण रोजगार निर्माण होण्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय महावितरणच्या वीज खरेदी खर्चात दरवर्षी सुमारे १० हजार कोटी रुपयांची बचत होणार असून, क्रॉस सबसिडीचा १३ हजार ५०० कोटी रुपयांचा बोजा कमी होईल, असेही सांगण्यात येते.

मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत जमीन उपलब्ध न होणे, ग्रामस्थांचा विरोध, वन विभाग व गायरान जमिनींसाठीचे परवाने रखडणे, तसेच नैसर्गिक आपत्ती यांसारख्या अडथळ्यांमुळे प्रकल्पांची गती मंदावली आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष काम सुरू नसतानाही मंजुरी देण्यात आल्याचे आरोप होत आहेत.

ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ जयंत देव यांच्या मते, स्थानिक शेतकरी सहकारी संस्थांच्या माध्यमातून हे प्रकल्प राबवले असते तर जमीन उपलब्धता आणि रोजगारनिर्मितीचे प्रश्न सुटले असते. मात्र ठरावीक कंपन्यांनाच कंत्राटे दिल्याने योजनेचा मूळ उद्देश बाजूला पडल्याची टीकाही केली जात आहे.

दरम्यान, सौर ऊर्जेच्या माध्यमातून स्वस्त आणि शाश्वत वीजपुरवठ्याची मोठी संधी असतानाही धोरणात्मक गोंधळ आणि प्रशासकीय अडथळ्यांमुळे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजना सध्या तरी कागदावरच अधिक आणि प्रत्यक्षात कमी अशीच राहिल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## मुंबईत मनसेचा 'भगवा गार्ड' ॲक्शन मोडमध्ये : बाळा नांदगावकर

**मुंबई, ता. १५ :** महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानादरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर यांनी आक्रमक भूमिका घेत सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले. मुंबईत मतदानाचा उत्साह पाहून समाधान व्यक्त करताना त्यांनी ही निवडणूक केवळ मराठी मतदारांची नाही, तर सर्व भाषिक मुंबईकरांची असल्याचं ठामपणे सांगितलं.

केवळ मराठी नाही, तर इतर भाषिक नागरिकही मतदानासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडले आहेत. मुंबई सुरक्षित ठेवायची असेल तर ठाकरेंशिवाय पर्याय नाही, या भावनेतून मतदान सुरू आहे, याचा मला आनंद आहे, असं बाळा नांदगावकर म्हणाले. मात्र, मतदान प्रक्रियेबाबत त्यांनी तीव्र नाराजीही व्यक्त केली.

बोटाचीशाईपुसल्याच्यातक्रारींवर बोलताना नांदगावकरांनी निवडणूक व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. लोकांचा मतदान प्रक्रियेवरील विश्वास दुर्दैवाने उडत चालला आहे. सरकार आपल्या फायद्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या लावत आहे, असा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी ईव्हीएम सोबत वापरल्या जाणाऱ्या यंत्रणांवरही टीका केली. व्हीव्हीपॅट काढून पाडू मशीन आणण्याची गरज काय होती? काल अचानक ही मशीन आणणं संशयास्पद आहे. लबाडीने मतदानावर परिणाम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असं ते म्हणाले.

दुबार मतदान रोखण्यासाठी भगवा गार्ड तैनात केल्याच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी स्पष्ट केलं की, प्रशासनाने आपलं काम करावं, आम्ही आमचं करतोय. अधिकाऱ्यांना आणि यंत्रणेला हाताशी धरून जर चुकीच्या गोष्टी केल्या जाणार असतील, तर आम्ही गप्प बसणार नाही. दुबार मतदार आढळल्यास त्यांच्यावर कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही निवडणूक प्रक्रियेवर तीव्र टीका केली. सत्तेचा गैरवापर करण्यालाही मर्यादा असते. अशा प्रकारच्या फ्रॉड निवडणुका म्हणजे लोकशाहीची चांगली लक्षणं नाहीत. अशा मार्गाने सत्तेवर येणं म्हणजे निवडणूक नव्हे, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांना सुनावलं.

एकीकडे मतदानाचा उत्साह, तर दुसरीकडे प्रक्रियेवरील संशय या पार्श्वभूमीवर मुंबईसह राज्यातील ही निवडणूक केवळ निकालापुरती न राहता लोकशाहीच्या विश्वासाची कसोटी ठरत असल्याचं चित्र आहे.

## शिक्षक संस्कारी पिढी घडविण्याचे कार्य करतात : प्रांत अतुल म्हेत्रे

**कराड, ता. १३ :** शिक्षक हे समाजाची खरी शिल्पकार असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करीत असतात. शिक्षकांच्या हातूनच संस्कारी, जबाबदार आणि सक्षम पिढी निर्माण होते, असे प्रतिपादन कराडचे प्रांत तथा उपविभागीय दंडाधिकारी अतुल म्हेत्रे यांनी केले.



कराड नगरपरिषद शाळा क्रमांक १२ यांच्या वतीने आयोजित व्हायब्रेशन रीलोडेड २०२६ या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन शुक्रवारी (ता. ०९) यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन, कराड येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून अतुल म्हेत्रे तर अध्यक्षस्थानी नगरपरिषद शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी रमेश कांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या वरिष्ठ मुख्याध्यापिका लतादेवी कारंडे यांनी केले. याप्रसंगी कोटा अकॅडमी, कराडच्या संस्थापिका मंजिरी खुस्पे यांनी शाळा क्रमांक १२ मधील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दत्तक घेऊन आवश्यक शैक्षणिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच ग्लोबल व्यासपीठाचे संचालक श्री. सूर्यकांत पानसकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाची योग्य पद्धत व ज्ञान आत्मसात करण्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास नूतन नगरसेवक आशुतोष डूबल, शिवाजी पवार, नगरसेविका कीर्तिका विभुते, वर्षा वास्के, वृंदावन सोसायटी मलकापूरचे सचिव तथा युवा उद्योजक विजय कोळेकर, पत्रकार शंकर गोडसे, उद्योजक राजेश वेल्हाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पिराप्पा बडदाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण नाबदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. प्राजक्ता कुलकर्णी, स्नेहलता यमगर, प्रवीण नाबदे, श्रीपाद हेळंबकर, रोहिणी बजबळे, नंदिनी पाटील, विशाखा जगताप, सुचित्रा सोनवले, वैशाली पवार, सफवाना पटवेकर व मेहजबिन शेख यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे आभार रोहिणी बजबळे यांनी मानले.

# अजितदादांनी सिंचन घोटाळ्याचा बॉम्ब फोडला; भाजप-युती सरकारबाबत गौप्यस्फोट

**पुणे, ता. १५ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजप यांच्यातील संघर्ष चांगलाच पेटला आहे. दोन्ही शहरांत अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत असून थेट लढत भाजपासोबत होत आहे. त्यामुळे प्रचाराच्या रणांगणात आरोप-प्रत्यारोपांची धार अधिक तीव्र होत चालली आहे.

याच पार्श्वभूमीवर अजित पवारांनी पुन्हा एकदा सिंचन घोटाळ्याचा मुद्दा उकरून काढत भाजप-शिवसेना युती सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. पुण्यातील पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी म्हटले की, १९९९ पूर्वीच्या काळात सिंचन प्रकल्पांच्या खर्चात जाणीवपूर्वक वाढ करण्यात आली होती आणि त्यामागे पार्टी फंडसाठी कोट्यवधी रुपयांची मागणी केली जात होती.

अजित पवारांच्या म्हणण्यानुसार, एका सिंचन प्रकल्पाची मूळ किंमत २०० कोटी रुपये होती. मात्र तत्कालीन भाजप-शिवसेना युती सरकारच्या काळात या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये पार्टी फंड म्हणून मागितले गेले. याशिवाय काही अधिकाऱ्यांनी त्यात आणखी १० कोटींची भर घातली आणि २०० कोटींचा प्रकल्प थेट ३१० कोटी रुपयांवर गेला. विशेष म्हणजे त्या काळात सिंचन खाते भाजपकडे होते, याकडे लक्ष वेधत अजित पवारांनी थेट भाजपला लक्ष्य केले आहे.



महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळ माझ्याकडे असताना मला अनेक प्रकल्पांच्या फाईली मिळाल्या. पुरंदर सिंचन योजना ३३० कोटी रुपयांवर नेण्यात आली होती. काही अधिकाऱ्यांनी मला सांगितले की यात मोठी गडबड आहे. ११० कोटी रुपयांची वाढ कशी झाली, याची चौकशी केली असता पार्टी फंडासाठी पैसे मागितल्याचे समोर आले. त्यामुळेच मी ती योजना रद्द केली. आजही त्या फाईली माझ्याकडे आहेत आणि गरज पडल्यास मी पुरावे दाखवेन, असा खळबळजनक दावा अजित पवारांनी केला.

याआधीही अजित पवारांनी ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप केले, तेच आज माझ्यासोबत सत्तेत बसले आहेत, असे म्हणत भाजपला टोला लगावला होता. त्यामुळे आता दोन्ही पक्षांमधील संघर्ष उघडपणे समोर येत आहे.

दरम्यान, भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अजित पवार हे वरिष्ठ नेते आहेत. त्यांनी १९९९ पासून आतापर्यंत गप्प का बसले? जर फाईली त्यांच्या हातात होत्या, तर तेव्हाच खुलासा का केला नाही? पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये नकारात्मक चित्र दिसत असल्यामुळेच ते अशी विधाने करत असावेत, असा पलटवार बावनकुळे यांनी केला.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरती मर्यादित न राहता, आता सत्तेतील मित्रपक्षांमधील तणाव उघड करणारी ठरली आहे. सिंचन घोटाळ्याचे आरोप, जुन्या फाईली, पार्टी फंडाचे दावे आणि थेट आरोप-प्रत्यारोप यामुळे ही निवडणूक अधिकच रंगतदार आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची बनली आहे. पुणेकर आणि पिंपरी-चिंचवडकर आता केवळ नगरसेवक निवडत नाहीत, तर या सत्तासंघर्षावरही आपला कौल देणार आहेत.